SPORTS



मँचेस्टर सिटी उपांत्यपूर्व फेरीत

मँचेस्टर : दोनदा पिछाडीवर पडल्यानंतरही जोरदार मुसंडी मारत मँचेस्टर सिटीने कॅराबाओ चषकाच्या चौथ्या फेरीत ब्रायटन अँड होव्ह अल्बियनचा पेनल्टी शूटआऊटमध्ये ४-३ असा पराभव केला आणि या विजयासह स्पर्धेच्या उपांत्यपूर्व फेरीत प्रवेश निश्चित केला आहे. राखीव गोलरक्षक गेरोनिमो रुलीने शूटआऊटमध्ये दोन पेनल्टी रोखून संघाच्या विजयात निर्णायक भूमिका बजावली. एर्लिंग हालांड, रुबेन दियास आणि जियानलुइगी डोनारुम्मा यांसारख्या प्रमुख खेळाडूंना विश्रांती देत प्रशिक्षक एन्झो मारेस्का यांनी खेळाडूंच्या फेरबदलाचा घेतलेला निर्णय अखेर यशस्वी ठरला. निर्धारित वेळेत दोन्ही संघ २-२ अशा बरोबरीत सुटल्याने सामन्यात पेनल्टी शूटआऊटचा अवलंब करण्यात आला.

महिला टी-२० क्रिकेट : दिल्लीचा ६ बाद २६२ धावांचा विक्रम

पुणे : वरिष्ठ महिला टी-२० चषक स्पर्धेतील साखळी सामन्यात दिल्ली



संघाने ऐतिहासिक कामगिरी करत हैदराबादविरुद्ध ६ बाद २६२ धावांचा डोंगर उभारला. देशांतर्गत महिला टी-२० क्रिकेटच्या इतिहासातील ही आतापर्यंतची सर्वोच्च धावसंख्या ठरली आहे. सलामीवीर तनिषा सिंग हिच्या ४७ चेंडूंत ११९ धावांच्या झंझावाती खेळीच्या जोरावर दिल्लीने हा नवा इतिहास रचला. यापूर्वी २०१९-२० च्या हंगामात गोव्याने अरुणाचल प्रदेशविरुद्ध २ बाद २५७ धावा रचल्या होत्या. तो विक्रम दिल्लीने येथे मागे टाकला. तनिषा सिंगने ४७ चेंडूंत २५ चौकार, १ षटकारासह ११९ धावा फटकावल्या. या मोठ्या आव्हानाचा पाठलाग करताना हैदराबादचा संघ २० षटकांत ८ बाद १५४ धावांपर्यंतच मजल मारू शकला.

मिरामारमध्ये रविवारी रंगणार 'आयर्नमॅन ७०.३ गोवा' स्पर्धा

पणजी : 'आयर्नमॅन ७०.३ गोवा' या जागतिक दर्जाच्या शर्यतीची सहावी आवृत्ती रविवार, १ नोव्हेंबर रोजी मिरामार येथे रंगणार आहे. या स्पर्धेच्या अधिकृत फिनिशर जर्सी आणि पदकाचे गुरुवारी अनावरण करण्यात आले. गोव्याच्या पारंपरिक वैशिष्ट्यपूर्ण टाईल्सच्या डिझाईनपासून प्रेरणा घेऊन जर्सी आणि पदक तयार करण्यात आले आहे. स्पर्धेला मिरामार बीचवर सुरुवात होईल. या इव्हेंटमध्ये १.९ किलोमीटर पोहणे, ९० किलोमीटर सायकल चालवणे आणि २१.१ किलोमीटर धावणे, असे आव्हानात्मक टप्पे असतील. ३० देशांतील २,००० हून अधिक खेळाडू यात सहभागी होणार आहेत.

युवा राष्ट्रीय बास्केटबॉल स्पर्धेत महाराष्ट्राची धडाकेबाज सुरुवात

गुजरातला ८४-६१ ने हरवत विजयी सलामी



पुणे : पुढारी वृत्तसेवा

४१ व्या युवा राष्ट्रीय बास्केटबॉल अजिंक्यपद स्पर्धेत महाराष्ट्राच्या संघाने दमदार खेळाचे प्रदर्शन करत गुजरातवर ८४-६१ असा दणदणीत विजय मिळवला. पुण्यात सुरू असलेल्या या स्पर्धेत महाराष्ट्राने पहिल्याच सामन्यात विजय मिळवत आपल्या अभियानाची शानदार सुरुवात केली.

महाराष्ट्र राज्य बास्केटबॉल संघटनेच्या वतीने आयोजित या प्रतिष्ठेच्या राष्ट्रीय स्पर्धेचे तब्बल १५ वर्षांनंतर महाराष्ट्रात आयोजन होत आहे. त्यामुळे राज्यातील बास्केटबॉल क्षेत्रासाठी या स्पर्धेला विशेष महत्त्व प्राप्त झाले आहे.गुजरातविरुद्धच्या सामन्यात महाराष्ट्राच्या संघाने विजयासाठी आवश्यक असलेली जिद्द आणि आत्मविश्वास दाखवला. २३ गुणांच्या फरकाने मिळवलेल्या या विजयामुळे संघाचे मनोबल उंचावले असून, आगामी सामन्यांसाठी महाराष्ट्राचा संघ सज्ज झाला आहे.महाराष्ट्र संघाच्या मुख्य प्रशिक्षकपदी ललित नाहाटा असून, प्रशिक्षक सोनेश झोरे आणि दशरथ बिरहामणे यांचे मार्गदर्शन संघाला लाभत आहे. देवांशी लुनावत संघ व्यवस्थापक म्हणून जबाबदारी सांभाळत आहेत.राष्ट्रीय स्तरावरील या स्पर्धेत महाराष्ट्राला विजेतेपदाच्या दिशेने वाटचाल करण्याची संधी असून, पहिल्या विजयामुळे संघाच्या पुढील कामगिरीकडे बास्केटबॉलप्रेमींचे लक्ष लागले आहे.

यंग भारत सेवा मंडळाची कुमार गट राज्यस्तरीय कबड्डी स्पर्धा

मुंबई: पुढारी वृत्तसेवा

प्रभादेवी येथील यंग भारत सेवा मंडळाच्या विद्यमाने मंडळाच्या हिरक महोत्सवी वर्षानिमित्त २३ ते २७ नोव्हेंबर २०२६ या कालावधीत कुमार गट राज्यस्तरीय कबड्डी स्पर्धेचे आयोजन करण्यात आले आहे.

राजाभाऊ साळवी स्मृती क्रीडागरीतील भिकाजी गुणाजी भारती स्मृती क्रीडागणावर होणारी ही स्पर्धा मुंबईतील या हंगामातील पहिलीच राज्यस्तरीय कबड्डी स्पर्धा आहे. या स्पर्धेत १२ निमंत्रित संघ सहभागी होतील. या निमित्ताने उदयोन्मुख खेळाडूंना कौशल्य दाखविण्याची संधी उपलब्ध होणार आहे. प्रवेशाबाबत अधिक माहितीकरिता शंकर पाटकर आणि सुधीर खानोलकर यांच्याशी संपर्क साधावा, असे कळविण्यात आले आहे.

दहिसर विद्यामंदिर शाळेचा विजयाचा चौकार

मुंबई : पुढारी वृत्तसेवा

दहिसरच्या विद्यामंदिर शाळेने खारघरच्या रायन इंटरनॅशनल स्कूलचा ८ विकेट राखून पराभव हॅरिस ढाल आंतरशालेय क्रिकेट स्पर्धेच्या प्लेट गटात सलग चौथा विजय नोंदवला.

आझाद मैदानात झालेल्या सामन्यात विद्यामंदिर शाळेने प्रतिस्पर्धी संघावर वर्चस्व राखले. यश गवई, श्लोक खापरे, श्लोक चव्हाण, रुद्र बारी आणि लक्ष्मण यादव यांची सरस कामगिरी त्यांच्या विजयाचे प्रमुख वैशिष्ट्य ठरले. रायन इंटरनॅशनल स्कूलला ७४ धावांत गुंडाळताना विद्यामंदिरने माफक आव्हान १६ षटकांत केवळ दोन विकेटच्या बदल्यात पार केले. यश गवईने ४ षटकांत फक्त ६ धावा देत रायनच्या ४ फलंदाजांना पॅव्हेलियनचा रस्ता दाखवला.

श्लोक खापरेने ३, श्लोक चव्हाणने २ तर स्मित केरकरने १ विकेटस घेत त्याला चांगली साथ दिली. विद्यामंदिरकडून रुद्र बारी (नाबाद ३१) लक्षण यादवने (नाबाद २८ धावा) फलंदाजीमध्ये बहुमोल योगदान दिले.

किवींची पुन्हा 'कसोटी'?

भारत-न्यूझीलंड यांच्यात आज चौथी टी-२०



ऑकलंड : सराव सत्रादरम्यान इशान किशन-वैभव सूर्यवंशी.

- भारतीय संघाकडे राखीव खेळाडूंना खेळवण्याची संधी

ऑकलंड : वृत्तसंस्था

भारत-न्यूझीलंड यांच्यात पाच सामन्यांच्या टी-२० मालिकेतील चौथी लढत आज (दि. ३०) येथील ईडन पार्क मैदानावर रंगणार आहे. सुरुवातीचे तिन्ही सामने जिंकून भारताने मालिकेत आधीच ३-० अशी विजयी आघाडी घेतली असून, आजच्या सामन्यातही भारताचा फलंदाजीचा झंझावात रोखण्याचे मोठे आव्हान यजमान न्यूझीलंडसमोर असेल. या लढतीला भारतीय प्रमाणवेळेनुसार दुपारी १२.३० वाजता सुरुवात होईल.

एकीकडे, न्यूझीलंडचा संघ आपल्या काही खेळाडूंच्या दुखापतीने त्रस्त असताना दुसरीकडे, भारतीय संघाकडे मालिका यापूर्वीच जिंकली असल्याने येथे राखीव खेळाडूंना आजमावण्याचा पर्याय विचाराधीन असू शकतो.

यापूर्वी अभिषेक शर्मा आणि वैभव सूर्यवंशी यांनी वेलिंग्टन येथे अवघ्या १३.२ षटकांत १९९ धावांचा पाठलाग करत भारताच्या फलंदाजी फळीची ताकद अधोरेखित केली होती. पॉवरप्लेमधील त्यांच्या वादळी फलंदाजीपुढे न्यूझीलंडने उभा केलेला १९८ धावांचा डोंगर अगदीच खुजा भासला होता. त्यात आजच्या मैदानावर सीमारेषा कमी अंतरावर असल्याने न्यूझीलंडच्या गोलंदाजांवर प्रामुख्याने दडपण असू शकते.

येथील समोरची (स्ट्रेट) सीमारेषा इतकी लहान आहे की, ऑकलंडच्या लॉकी फर्ग्युसनने एकदा म्हटले होते, 'येथे प्रेक्षक अगदी आपल्या पाठीवरच उभे आहेत असा भास होतो, हे देखील येथे लक्षवेधी आहे. या सामन्याची सर्व तिकिटे यापूर्वीच विकली गेली असून, ४० हजार प्रेक्षकांत भारतीयांचे प्रमाण अधिक असेल, हे सुनिश्चित आहे.

दुसरीकडे, टी-२० मालिकेनंतर होणाऱ्या वन-डे आणि कसोटी मालिकेच्या पार्श्वभूमीवर भारतासाठी येथे प्रमुख खेळाडूंना विश्रांती देण्याची उत्तम संधी असेल. कुलदीप यादव, वरुण चक्रवर्ती आणि शिवम दुबे यांना या मालिकेत अद्याप संधी मिळालेली नाही.

पुढील वन-डे आणि कसोटी सामन्यांच्या दृष्टीने नितीशकुमार रेड्डीला विश्रांती दिल्यास शिवम दुबेला आजच्या सामन्यात संधी मिळू शकते. पहिल्या सामन्यात खेळल्यानंतर प्रिन्स यादवसाठी जागा रिक्त केलेल्या वेगवान गोलंदाज मयांक यादवचाही पुनर्विचार होऊ शकतो.

छोट्या सीमारेषांमुळे रणनीती बदलावी लागणार!

ईडन पार्कच्या समोरच्या सीमारेषा इतक्या लहान आहेत की, त्या 'आयसीसी' नियमावलीतील (खेळपट्टीच्या मध्यभागापासून किमान ५९.४३ मीटर) निकषात बसत नाहीत. मात्र, हा नियम लागू होण्यापूर्वीचे हे मैदान असल्याने त्यास यातून सवलत देण्यात आली आहे. त्यामुळे आजच्या सामन्यात पुन्हा एकदा धावांचा पाऊस पडण्याची शक्यता आहे.

फर्ग्युसन मालिकेतून बाहेर; हेन्रीलाही दुखापतीचा फटका

मालिकेच्या मध्यावरच न्यूझीलंडच्या वेगवान माऱ्याला मोठा धक्का बसला आहे. लॉकी फर्ग्युसन पोटरीच्या स्नायूंच्या दुखापतीमुळे उर्वरित टी-२० मालिकेतून बाहेर पडला आहे, तर मॅट हेन्री मांडीच्या दुखापतीने ग्रस्त आहे. यजमान संघ पाच सामन्यांच्या मालिकेत आधीच ०-३ असा पिछाडीवर असल्याने, वन-डे मालिकेपूर्वी हे दोन्ही गोलंदाज तंदुरुस्त होणे यजमान संघासाठी विशेष महत्त्वाचे असेल.

भारत आजचा सामना **न्यूझीलंड**

स्थळ : ऑकलंड

सामन्याची वेळ : दु. १२.३० वा.

थेट प्रक्षेपण : सोनी स्पोर्टस् नेटवर्क

मुंबईची हरयाणावर मात

ऑफस्पिनर तनुष कोटियनच्या दुसऱ्या डावात ८ विकेट

मुंबई : पुढारी वृत्तसेवा

वांद्रे कुर्ला संकुलातील (बीकेसी) शरद पवार अकॅडमी मैदानावर झालेल्या रणजी करंडक क्रिकेट स्पर्धेतील एलिट ग्रुप डीमधील सामन्यात मुंबईने अष्टपैलू कामगिरीच्या जोरावर हरयाणावर १० विकेट राखून मात केली. ऑफस्पिनर तनुष कोटियनने (८१ धावांत ८ विकेट) दुसऱ्या डावात प्रभावी गोलंदाजी करत पाहुण्यांना २५६ धावांवर रोखले. त्यानंतर यजमानांनी ९७ धावांचे माफक एकही विकेट न गमावता अवघ्या १०.४ षटकांत पूर्ण केले. विक्रमी ४२ जेतेपदे नावावर असलेल्या मुंबईचा यंदाच्या हंगामातील हा सलग तिसरा आहे.



मुंबई : ऑफस्पिनर तनुष कोटियनने त्याच्या ५०व्या प्रथमश्रेणी सामन्यात १० किंवा त्यापेक्षा जास्त विकेट घेण्याची करामत साधली.

चौथ्या आणि अंतिम दिवशी गुरुवारी २ बाद ७३ धावांवरून पुढे खेळताना हरयाणाने दुसऱ्या डावात २५६ धावा केल्या. त्यांच्या उर्वरित ७ फलंदाजांनी आणखी १८३ धावांची भर घातली. हरयाणातर्फे हिमांशू राणाने सर्वाधिक ४६ धावा केल्या.

त्याच्यानंतर आठव्या आणि नवव्या क्रमांकावरील अनुक्रमे समंत जाखर (४०) आणि अनुज ठकरालच्या (नाबाद ४०) रूपाने शेपटू वळवळल्याने पाहुण्यांची मजल अडीचशेपार गेली. पहिल्या डावात मुशीरसमोर गुडघे टेकणाऱ्या हरयाणाच्या फलंदाजांनी दुसऱ्या डावात तनुषच्या फिरकीसमोर लोटांगण घातले. तनुषने ८१ धावांच्या मोबदल्यात तब्बल ८ विकेट चटकावल्या. तनुषने पहिल्या डावात ३ विकेट घेतल्या होत्या. तनुषने ५०व्या सामन्यात पहिल्यांदाच सामन्यात १० किंवा त्यापेक्षा जास्त विकेट घेण्याची करामत साधली.

मुंबईसमोर विजयासाठी ९७ धावांचे माफक लक्ष्य होते. अंगकृष रघुवंशीने नाबाद ६७ आणि दिव्यांश सक्सेनाने नाबाद ३० धावा करत मुंबईला १० विकेट राखून विजय मिळवून दिला. तत्पूर्वी, मुंबईने अंगक्रिश रघुवंशी (११४) आणि मुशीर खानच्या (१०९) शतकांच्या जोरावर पहिल्या डावात ४३० धावांचा डोंगर उभारला. हरयाणाला २७० धावा करता आल्या. त्यामुळे त्यांच्यावर फॉलोऑनची नामुष्की ओढवली. शतकी खेळी करणाऱ्या मुशीरने गोलंदाजीतही चमक दाखवत ६ विकेट त्यात मोलाचा वाटा उचलला. अष्टपैलू मुशीर खानला सामनावीर पुरस्काराने गौरवण्यात आले.

मुंबईचा बोनस गुणांसह मिळवलेला हा सलग तिसरा विजय आहे. विजयाच्या हॅट्ट्रिकसह त्यांनी २१ गुणांसह एलिट डी ग्रुपमध्ये अव्वल स्थान कायम राखले. हरियाणाचा तीन सामन्यांतील हा पहिलाच पराभव आहे.

पी. व्ही. सिंधू, लक्ष्य सेनची आगेकूच

हायलो ओपन बॅडमिंटन स्पर्धा

सारब्रुकन (जर्मनी) : गेल्या आठवड्यातील फ्रेंच ओपनच्या उपविजेतेपद मिळवणाऱ्या पी. व्ही. सिंधूने येथे बीडब्ल्यूएफ हायलो ओपन सुपर ५०० स्पर्धेच्या पहिल्या फेरीत २८ मिनिटात सहज विजय मिळवला. लक्ष्य सेननेदेखील सहज आगेकूच केली, तर प्रणॉय मात्र पहिल्या फेरीत गारद झाला.

महिला एकेरीत दुसऱ्या मानांकित सिंधूने संयुक्त अरब अमिरातीच्या प्रकृती भरतचा २१-१०, २१-१० असा २८ मिनिटांत पराभव केला. सातव्या मानांकित लक्ष्य सेनने फिनलंडच्या जोकिम ओल्डोर्फविरुद्ध तासाभराहून अधिक काळ चाललेल्या लढतीत १६-२१, २१-९, २१-१३ असा विजय मिळवला. किरण जॉर्जनेही सरळ गेममध्ये दमदार विजय नोंदवत आगेकूच केली.

त्याने मलेशियाच्या चेम जून वेईवर २१-१८, २१-१७ अशी मात केली. पुरुष एकेरीत एच. एस. प्रणॉयला मात्र फ्रान्सच्या तोमा ज्युनियर पोपोव्हविरुद्ध २१-२३, १६-२१ असा पराभव पत्करावा लागला.

जेट एअरवेज (इंडिया) लिमिटेड (परिसमापनाधीन)

नोंदणीकृत कार्यालय - स्टर्लिंग सेंटर, ४०१-४०७, ४था मजला, डिवाईन चाईल्ड हायस्कूल समोर, अंधेरी कुर्ला रोड, चकाला, अंधेरी पूर्व, मुंबई महा. ४०००९३

सीआयएन : L99999MH1992PLC066213

(माननीय एनसीएलटीच्या दिनांक २६ नोव्हेंबर २०२४ च्या आदेशानुसार परिसमापन प्रक्रियेतून जात असलेली कंपनी)

ई-लिलावासाठी जाहीर घोषणा

दिवाळखोरी आणि नादारी संहिता, २०१६ आणि त्याअंतर्गत तयार केलेल्या नियमांनुसार नोटीस

जेट एअरवेज (इंडिया) लिमिटेड (परिसमापनात) (**''कॉर्पोरेट कर्जदार''**) यांच्या मालकीच्या आणि कॉर्पोरेट कर्जदाराच्या परिसमापन मालमत्तेचा भाग असलेल्या २ (दोन) मालमत्तांच्या (खालील तक्त्यात वर्णिल्याप्रमाणे) विक्रीसाठी बोली मागवणाऱ्या ई-लिलावाबाबतची ही नोटीस स्वाक्षरीकर्त्याद्वारे सर्वसामान्य जनतेला दिली जात आहे. दिवाळखोर आणि नादारपणा संहिता, २०१६ **("IBC")** मधील तरतुदींनुसार आणि त्या अंतर्गत तयार केलेले नियम व विनियम वाचून, ''जसे आहे जिथे आहे'', ''जसे आहे जसे पडेल तसे'', ''जसे आहे स्थितीत, जे काही तिथे आहे'' आणि ''कोणत्याही माघारीच्या अधिकाराशिवाय'' तसेच कोणतेही प्रतिनिधित्व, हमी किंवा हमीपत्राशिवाय ही विक्री केली जाईल.

विक्री खाली स्वाक्षरी करणाऱ्या द्वारे ई-लिलाव प्लॅटफॉर्म बँकनेट (पूर्वीचे ईबीक्राय) https://ibbi.baanknet.com (**''ई-लिलाव प्लॅटफॉर्म''**) वर, आयबीबीआय (परिसमापन प्रक्रिया) विनियम, २०१६ चे नियम ३२ आणि मालमत्ता विक्री प्रक्रिया मेमोरँडम दिनांक ३० ऑक्टोबर २०२६ (**''एएसपीएम''**) नुसार केली जाईल. सर्व संभाव्य बोलीदारांना विनंती आहे की त्यांनी एएसपीएमच्या कलम ४ (पात्रता कागदपत्रे) मध्ये नमूद केलेल्या कागदपत्र सादर करण्याच्या आवश्यकतांनुसार सर्व पात्रता कागदपत्रे आणि अनामत रक्कम सादर करावी.

ई-लिलावाच्या महत्त्वाच्या तारखांचे वेळापत्रक	
पात्रता कागदपत्रे आणि कलम २९अ प्रतिज्ञापत्र ई-लिलाव प्लॅटफॉर्मवर सादर करण्याची अंतिम तारीख आणि वेळ	बुधवार, ११ नोव्हेंबर २०२६, संध्याकाळी ५:०० वाजता (युटीसी+५:३०)
अनामत रक्कम (**''ईएमडी''**) ई-लिलाव प्लॅटफॉर्मवर जमा करण्याची अंतिम तारीख आणि वेळ	बुधवार, ११ नोव्हेंबर २०२६, संध्याकाळी ५:३० वाजता (युटीसी+५:३०)
ई-लिलावाची तारीख आणि वेळ	शुक्रवार, १३ नोव्हेंबर २०२६, सकाळी १०:०० ते संध्याकाळी ५:०० वाजेपर्यंत (युटीसी+५:३०)
अंतिम विक्री मोबदला पेमेंटची अंतिम तारीख	स्वाक्षरीकर्त्याकडून अंतिम विक्री मोबदला देण्यासाठी मागणी पत्राच्या जारी तारखेपासून साठ (६०) दिवसांच्या आत

रक्कम भारतीय रुपयांमध्ये

अनु. क्र.	मालमत्तेचे वर्णन	मालमत्ता आयडी	लिलाव आयडी	राखीव किंमत*	इसारा अनामत रक्कम (ईएमडी)	बोली वाढीचे मूल्य
१	केटरिंग जेवणाचे गाड्या	४२७५	५२०१	२,१५,७९,४६१	२१,५७,९४६	१०,७८,९७३
२	केटरिंग आणि प्रशासकीय इन्व्हेंटरी	४२७६	५२०२	६६,१२,४६८	६,६१,२४७	३,३०,६२३

*इतर गोष्टींबरोबरच, कर, उपकर, शुल्क, कर्तव्ये, हस्तांतरण शुल्क, मुद्रांक शुल्क, नोंदणी शुल्क, प्रीमियम आणि विक्री पूर्ण करण्यासाठीचे सर्व लागू आवश्यक खर्च वगळून, ज्याचे अधिक तपशील ASPM च्या कलम १९ (खर्च, खर्च आणि कर परिणाम) मध्ये वर्णित आहेत. स्वाक्षरीकर्ता किंवा नुकसानभरपाई प्राप्त पक्षांकडून (एएसपीएम मध्ये परिभाषित केल्यानुसार) कोणतीही प्रतिनिधित्व, हमी किंवा हमीपत्रे प्रदान केली जाणार नाहीत.

महत्त्वाच्या टीपा:

१. वर सूचीबद्ध केलेल्या २ (दोन) मालमत्तांसाठी BAANKNET पोर्टलवर २ (दोन) स्वतंत्र ई-लिलाव आयोजित केले जातील.
२. ही विक्री नोटीस ASPMs सह वाचली जावी, ज्यामध्ये मालमत्तांचे तपशील, घोषणा, प्रतिज्ञापत्रे आणि IBC च्या कलम २९अ अंतर्गत पात्रतेसाठी हमीपत्रे, आणि BAANKNET वर https://ibbi.baanknet.com/eauction-ibbi/auc-listing वर वरील मालमत्ता आणि लिलाव आयडी किंवा कॉर्पोरेट कर्जदाराच्या www.jetairways.com या संकेतस्थळावर उपलब्ध ई-लिलाव विक्रीचे सामान्य आणि तांत्रिक नियम व अटी समाविष्ट आहेत.
३. संभाव्य बोलीदारांनी आवश्यक पात्रता कागदपत्रे आणि इसारा अनामत रक्कम केवळ आणि काटेकोरपणे ई-लिलाव प्लॅटफॉर्मद्वारे निश्चित मुदतीत, ASPM च्या कलम ४ (पात्रता कागदपत्रे) नुसार सादर करावीत, लिक्विडेटरकडे नाही.
४. ई-लिलाव प्लॅटफॉर्म आणि कागदपत्रे व इसारा अनामत रक्कम सादर करण्याबाबतच्या कोणत्याही शंकांसाठी, कृपया BAANKNET शी +९१ ८२९१२२०२२० वर आणि support.baanknet@psballiance.com वर संपर्क साधावा.
५. ई-लिलावाबाबतच्या कोणत्याही शंकांसाठी, कृपया लिक्विडेटरचे अधिकृत प्रतिनिधी, श्री. श्लोक नंदनवार (+९१-८२०८५०३६९३) यांच्याशी jetliquidation@in.ey.com आणि liquidation.jet@gmail.com वर "Catering Asset Sale - Mumbai" या विषय ओळीसह) संपर्क साधावा. कृपया लक्षात ठेवा की पात्रता कागदपत्र आणि बोलीच्या संदर्भातील कोणतेही कागदपत्र लिक्विडेटर, त्यांचे प्रतिनिधी किंवा त्यांचे सल्लागार यांच्याकडे सादर करायचे नाही.
६. हे स्पष्ट केले जाते की ही नोटीस खाली स्वाक्षरी करणाऱ्याच्या किंवा जेट एअरवेज (इंडिया) लिमिटेडच्या (परिसमापनात) बाजूने विक्री अमलात आणण्यासाठी कोणतीही बंधनकारक जबाबदारी निर्माण करत नाही. खाली स्वाक्षरी करणाऱ्याद्वारे घेतलेला कोणताही निर्णय अंतिम असेल आणि सर्व संभाव्य बोलीदारांवर बंधनकारक असेल.
७. हे स्पष्ट केले जाते की येथे आणि ASPM मध्ये नमूद केलेले मालमत्तेचे तपशील केवळ सामान्य संदर्भासाठी प्रदान केले आहेत. नुकसानभरपाई प्राप्त पक्ष (ASPM मध्ये परिभाषित केल्यानुसार) मालमत्तेच्या वर्णनात किंवा स्थितीत कोणत्याही प्रकारची कमतरता/अचूकता/विसंगतता/चुकीचे विधान/वगळणे/बदल/तफावत किंवा त्रुटी यासाठी कोणतीही जबाबदारी किंवा उत्तरदायित्व स्पष्टपणे नाकारतात आणि त्यांच्याकडे कोणतीही जबाबदारी असणार नाही, मग अशी विसंगतता ई-लिलाव पूर्ण होण्यापूर्वी, दरम्यान किंवा नंतर शोधली गेली असो वा नसो. मालमत्तेची विक्री काटेकोरपणे जसे आहे जिथे आहे, जसे आहे तसे पडेल तसे, जसे आहे स्थितीत आणि माघारीच्या अधिकाराशिवाय आणि कोणत्याही प्रतिनिधित्व, हमी किंवा हमीपत्राशिवाय केली जाते.
८. अंतिम विक्री मोबदला देयता एएसपीएमच्या कलम १५ (अंतिम विक्री मोबदला देयता) आणि १६ (विक्री पूर्ण करणे) मध्ये नमूद केलेल्या कालावधी, व्याजाच्या तरतुदी आणि जप्तीच्या अटींच्या अधीन आहे.
९. परिसमापक, सीओसीच्या सल्ल्यानुसार, लागू कायद्यानुसार अन्यथा प्रदान केल्याशिवाय, कोणतेही कारण न देता कोणत्याही टप्प्यावर ई-लिलाव प्रक्रिया रद्द करण्याचा किंवा थांबवण्याचा अधिकार राखून ठेवतात.

स्वाक्षरी/-
सतिश कुमार गुप्ता
जेट एअरवेज (इंडिया) लिमिटेडचे परिसमापक
आयपी नोंदणी क्र. : IBBI/IPA-001/IP-P00023/2016-17/10056
एएफए क्र. - AA1/10056/02/311226/108454
एएफए वैधता डिसेंबर ३१, २०२६ पर्यंत
ईमेल : liquidation.jet@gmail.com

दिनांक : ३०.१०.२०२६
ठिकाण : मुंबई

जेट एअरवेज (इंडिया) लिमिटेड (परिसमापनात)

नोंदणीकृत कार्यालय - स्टर्लिंग सेंटर, ४०१-४०७, चौथा मजला, डिवाइन चाईल्ड हायस्कूलच्या समोर, अंधेरी कुर्ला रोड,चाकाला, अंधेरी पूर्व, मुंबई - ४०००९३ सीआयएन (CIN): एल ९९९९९ एमएच १९९२ पीएलसी०६६२१३

(माननीय एनसीएलटीच्या दिनांक २६ नोव्हेंबर २०२४ रोजीच्या आदेशानुसार परिसमापन प्रक्रियेतून जाणारी कंपनी)

ई-लिलावासाठी सार्वजनिक घोषणा

ना दिवाळखोरी आणि नादारी संहिता, २०१६ आणि त्या अंतर्गत तयार केलेल्या नियमांनुसार नोटीस

याद्वारे खाली स्वाक्षरी करणाऱ्या व्यक्तीकडून सर्वसामान्य जनतेला ई-लिलावाची नोटीस देण्यात येत आहे, ज्यामध्ये जेट एअरवेज (इंडिया) लिमिटेड (परिसमापनात) (''कॉर्पोरेट डेटर'') च्या मालकीच्या ३ (तीन) मालमत्तांची विक्री करण्यासाठी (खालील तक्त्यात वर्णन केल्याप्रमाणे) बोली मागवण्यात येत आहेत. कॉर्पोरेट डेटरच्या परिसमापन मालमत्तेचा भाग असलेल्या या मालमत्ता, दिवाळखोरी आणि नादारी संहिता, २०१६ (**''IBC''**) मधील तरतुदींनुसार आणि त्या अंतर्गत तयार केलेल्या नियम व नियमावलीनुसार, जसे आहे जिथे आहे, जसे आहे जे आहे, जसे आहे जसे काम करते, जसे आहे स्थितीत आणि कोणत्याही अधिकाराशिवाय/माघारीशिवाय या तत्त्वावर आणि कोणतीही हमी, वारेन्टी किंवा नुकसानभरपाई न देता विक्रीसाठी ठेवल्या आहेत.

सदर विक्री खाली स्वाक्षरी करणाऱ्या व्यक्तीद्वारे बँकनेट (- पूर्वीचे ईबीकेराय **eBKray**) या ई-लिलाव प्लॅटफॉर्मवर **https://ibbi.baanknet.com** ('ई-लिलाव प्लॅटफॉर्म'') द्वारे, आयबीबीआय (परिसमापन प्रक्रिया) नियम, २०१६ मधील नियम ३२ आणि दिनांक ३० ऑक्टोबर २०२६ रोजीचे मालमत्ता विक्री प्रक्रिया मेमोरँडम यानुसार पार पाडली जाईल. सर्व संभाव्य बोलीदारांना विनंती करण्यात येते की, सर्व पात्रता कागदपत्रे आणि इसारा अनामत रक्कम ही एएसपीएम च्या कलम ४ (पात्रता कागदपत्रे) मध्ये नमूद केलेल्या कागदपत्रे सादर करण्याच्या अटींनुसार काटेकोरपणे आणि केवळ ई-लिलाव प्लॅटफॉर्मवरच सादर करावीत.

ई-लिलावाच्या महत्त्वाच्या तारखांचे वेळापत्रक	
तपशील	दिनांक आणि वेळ
ई-लिलाव प्लॅटफॉर्मवर पात्रता कागदपत्रे आणि कलम २९अ प्रतिज्ञापत्र सादर करण्याची अंतिम तारीख आणि वेळ	शनिवार, १४ नोव्हेंबर २०२६, संध्याकाळी ६:०० वाजता (UTC+5:30)
ई-लिलाव प्लॅटफॉर्मवर इसारा अनामत रक्कम) जमा करण्याची अंतिम तारीख आणि वेळ	शनिवार, १४ नोव्हेंबर २०२६, संध्याकाळी ६:३० वाजता (UTC+5:30)
ई-लिलावाची तारीख आणि वेळ	सोमवार, १६ नोव्हेंबर २०२६, सकाळी ११:०० ते संध्याकाळी ५:०० पर्यंत (UTC+5:30)
अंतिम विक्री मोबदला भरण्याची अंतिम तारीख	खाली स्वाक्षरी करणाऱ्या व्यक्तीकडून अंतिम विक्री मोबदला भरण्याच्या मागणीपत्राच्या इश्यू केल्यापासून साठ (६०) दिवसांच्या आत

रुपयांमध्ये (INR) रक्कम

अनुक्रमांक	मालमत्तेचे वर्णन	मालमत्ता आयडी	लिलाव आयडी	(राखीव किंमत*)	इसारा अनामत रक्कम	बोली वाढीचे मूल्य
१.	ॲपल आयपॅड एअर २	४४२८	५२६३	१८,८४,६७०	१,८८,४६७	९४,२३४
२.	नेटवर्किंग आणि इन्फ्रास्ट्रक्चर मालमत्ता	४४२९				
३.	वर्कस्टेशन पेरिफेरल्स	४४३०				

*कर, लेव्ही, शुल्क, करभार, हस्तांतरण शुल्क, स्टॅम्प ड्युटी, नोंदणी शुल्क, प्रीमियम आणि विक्री पूर्ण करण्यासाठी लागणारे सर्व आवश्यक खर्च वगळून (इतर गोष्टींबरोबरच), जसे की एएसपीएम (ASPM) च्या कलम १९ (खर्च, खर्च आणि कर परिणाम) मध्ये अधिक तपशीलवार वर्णन केले आहे. खाली स्वाक्षरी करणारी व्यक्ती किंवा हानीभरपाई मिळालेले पक्ष (संबंधित एएसपीएम मध्ये परिभाषित केल्यानुसार) यांच्याकडून कोणतीही हमी, वारेन्टी किंवा हानीभरपाई दिली जाणार नाही.

महत्त्वाच्या सूचना:

१. वरील सूचीबद्ध ३ (तीन) मालमत्तांसाठी बँकनेट पोर्टलवर १ (एक) ई-लिलाव आयोजित केला जाईल.
२. ही विक्री नोटीस एएसपीएम सोबत वाचली जावी, ज्यामध्ये मालमत्तांचे तपशील, घोषणापत्र, प्रतिज्ञापत्रे आणि आयबीसी (IBC) च्या कलम २९अ अंतर्गत पात्रतेसाठीचे अंडरटेकिंग्स, आणि बँकनेट वर https://ibbi.baanknet.com/eauction-ibbi/auc-listing येथे वरील मालमत्ता आणि लिलाव आयडीच्या समोर किंवा कॉर्पोरेट डेटरच्या www.jetairways.com या संकेतस्थळावर उपलब्ध असलेले ई-लिलाव विक्रीचे सामान्य आणि तांत्रिक नियम व अटी समाविष्ट आहेत.
३. संभाव्य बोलीदारांनी आवश्यक पात्रता कागदपत्रे आणि इसारा अनामत रक्कमही एएसपीएम च्या कलम. ४ (पात्रता कागदपत्रे) नुसार केवळ आणि काटेकोरपणे ई-लिलाव प्लॅटफॉर्मद्वारे निर्धारित मुदतीत सादर करावीत, लिक्विडेटरकडे नाही.
४. ई-लिलाव प्लॅटफॉर्म आणि कागदपत्रे व ईएमडी सादर करण्याबाबत कोणत्याही शंका असल्यास, संभाव्य बोलीदारांनी बँकनेटशी +९१ ८२९१२२०२२० वर आणि support.baanknet@psballiance.com वर संपर्क साधावा.
५. ई-लिलावाबाबत कोणत्याही शंका असल्यास, कृपया लिक्विडेटरचे अधिकृत प्रतिनिधी, श्री. श्लोक नंदनवार (+९१-८२०८५०३६९३), यांच्याशी jetliquidation@in.ey.com आणि liquidation.jet@gmail.com वर ''आयटी मालमत्ता विक्री - मुंबई'' या विषय ओळीसह) संपर्क साधावा. कृपया लक्षात ठेवा की पात्रता कागदपत्रे आणि बोलीशी संबंधित कोणतेही कागदपत्र लिक्विडेटर, त्यांचे प्रतिनिधी किंवा त्यांचे सल्लागार यांच्याकडे सादर करायचे नाही.
६. हे स्पष्ट करण्यात येते की ही नोटीस खाली स्वाक्षरी करणाऱ्या व्यक्तीवर किंवा जेट एअरवेज (INDIA) लिमिटेड (परिसमापनात) वर विक्री पूर्ण करण्यासाठी कोणतीही बंधनकारक जबाबदारी निर्माण करत नाही. खाली स्वाक्षरी करणाऱ्या व्यक्तीने घेतलेला कोणताही निर्णय अंतिम असेल आणि सर्व संभाव्य बोलीदारांवर बंधनकारक असेल.
७. हे स्पष्ट करण्यात येते की येथे आणि एएसपीएममध्ये नमूद केलेले मालमत्तेचे तपशील केवळ सामान्य संदर्भाच्या उद्देशाने काटेकोरपणे प्रदान केले आहेत. हानीभरपाई मिळालेले पक्ष (ASPM मध्ये परिभाषित केल्यानुसार) स्पष्टपणे नाकारतात आणि मालमत्तेच्या वर्णनात किंवा स्थितीमध्ये कोणत्याही प्रकारच्या त्रुटी/अनुसार नसणे/विसंगतता/चुकीचे विधान/वगळणे/फरक/तफावत किंवा त्रुटीसाठी कोणतीही जबाबदारी किंवा दायित्व असणार नाही, मग अशी विसंगतता ई-लिलाव पूर्ण होण्यापूर्वी, दरम्यान किंवा नंतर शोधली गेली असो वा नसो. मालमत्तेची विक्री काटेकोरपणे जसे आहे जिथे आहे, जसे आहे जे आहे, जसे आहे जसे काम करते आणि कोणत्याही अधिकाराशिवाय या तत्त्वावर आणि कोणतीही हमी, वारेन्टी किंवा नुकसानभरपाई न देता केली जाते.
८. अंतिम विक्री मोबदला देणे हे एएसपीएम च्या कलम १५ (अंतिम संचय मोबदला भरणे) आणि कलम १६ (विक्री पूर्ण करणे) मध्ये नमूद केलेल्या कालमर्यादा, व्याजाच्या तरतुदी आणि जप्तीच्या अटींच्या अधीन आहे.
९. लिक्विडेटर, सह-समितीच्या सल्ल्यानुसार, लागू कायद्यानुसार अन्यथा तरतूद केल्याशिवाय, कोणतेही कारण न देता कोणत्याही टप्प्यावर ई-लिलाव प्रक्रिया रद्द करण्याचा किंवा थांबवण्याचा अधिकार राखून ठेवतात.

स्वाक्षरी/-
सतीश कुमार गुप्ता
जेट एअरवेज (इंडिया) लिमिटेडचे लिक्विडेटर
आयपी नोंदणी क्रमांक : IBBI/IPA-001/IP-P00023/2016-17/10056
एएफए क्रमांक : AA1/10056/02/311226/108454
एएफए ३१ डिसेंबर २०२६ पर्यंत वैध आहे
ईमेल : liquidation.jet@gmail.com

दिनांक: ३०.१०.२०२६
स्थान: मुंबई

जेट एअरवेज (इंडिया) लिमिटेड (परिसमापनात)

नोंदणीकृत कार्यालय - स्टर्लिंग सेंटर, 401-407, चौथा मजला, डिव्हाईन चाईल्ड हायस्कूलच्या समोर, अंधेरी कुर्ला रोड, चकाला, अंधेरी पूर्व, मुंबई - 400093

सीआयएन : L99999MH1992PLC066213

(माननीय राष्ट्रीय कंपनी कायदा न्यायाधिकरणाच्या दिनांक २६ नोव्हेंबर २०२४ रोजीच्या आदेशानुसार परिसमापन प्रक्रियेतून जात असलेली कंपनी)

ई-लिलावासाठी सार्वजनिक घोषणा

दिवाळखोरी आणि नादारी संहिता, २०१६ आणि त्याअंतर्गत तयार केलेल्या नियमांनुसार सूचना

याद्वारे सर्वसाधारण जनतेस खाली सही करणाऱ्या व्यक्तीकडून सूचित करण्यात येते की, जेट एअरवेज (इंडिया) लिमिटेड (परिसमापनात) (**''कॉर्पोरेट कर्जदार''**) यांच्या मालकीच्या आणि कॉर्पोरेट कर्जदाराच्या परिसमापन मालमत्तेचा भाग असलेल्या मालमत्तेच्या (खालील तक्त्यात वर्णन केल्यानुसार) विक्रीसाठी बोली मागवणारे ई-लिलाव आयोजित केले जात आहेत. दिवाळखोरी आणि नादारी संहिता, २०१६ (**"IBC"**) च्या तरतुदींनुसार, त्याअंतर्गत तयार केलेले नियम आणि नियमावली वाचून, जसे आहे जिथे आहे, जसे आहे जे आहे, जसे आहे जशी स्थिती आहे, जे काही तिथे आहे आणि कोणत्याही माघारीशिवाय या तत्त्वावर आणि कोणत्याही प्रकारचे प्रतिनिधित्व, हमी किंवा प्रतिपूर्तीशिवाय हा लिलाव होईल.

ही विक्री खाली सही करणाऱ्या व्यक्तीद्वारे **https://ibbi.baanknet.com** (**'ई-लिलाव व्यासपीठ''**) वरील बँकनेट (पूर्वीचे ईबीक्रय) या ई-लिलाव व्यासपीठाच्या माध्यमातून, इतर गोष्टींबरोबरच, आयबीबीआय (परिसमापन प्रक्रिया) नियम, २०१६ चे नियम ३२ आणि दिनांक ३० ऑक्टोबर २०२६ च्या मालमत्ता विक्री प्रक्रिया मेमोरँडा (**"ASPMs"**) नुसार पार पाडली जाईल. सर्व संभाव्य बोलीदारांना विनंती करण्यात येते की त्यांनी सर्व पात्रता कागदपत्रे आणि अनामत रक्कम संबंधित एएसपीएमच्या कलम ४ (पात्रता कागदपत्रे) मध्ये नमूद केलेल्या कागदपत्र सादर करण्याच्या आवश्यकतांनुसार, काटेकोरपणे आणि केवळ ई-लिलाव व्यासपीठावरच सादर करावीत.

ई-लिलावासाठीच्या महत्त्वाच्या तारखांचे वेळापत्रक	
पात्रता कागदपत्रे आणि कलम २९अ हमीपत्र ई-लिलाव व्यासपीठावर सादर करण्याची अंतिम तारीख आणि वेळ	सोमवार, ३० नोव्हेंबर २०२६, सायंकाळी ५:०० वाजता (युटीसी+५:३०)
ई-लिलाव व्यासपीठावर अनामत रक्कम **("EMD")** जमा करण्याची अंतिम तारीख आणि वेळ	सोमवार, ३० नोव्हेंबर २०२६, सायंकाळी ६:०० वाजता (युटीसी+५:३०)
ई-लिलावांची तारीख	बुधवार, २ डिसेंबर २०२६, सकाळी ११:०० ते सायंकाळी ५:०० वाजेपर्यंत (युटीसी+५:३०)
अंतिम विक्री मोबदला पेमेंटची अंतिम तारीख	खाली सही करणाऱ्या व्यक्तीद्वारे अंतिम विक्री मोबदला पेमेंटसाठी मागणी पत्र जारी केल्यापासून साठ (६०) दिवसांच्या आत

रक्कम रुपयात

अ. क्र.	मालमत्तेचे वर्णन	मालमत्ता आयडी	लिलाव आयडी	राखीव किंमत	अनामत रक्कम (EMD)	बोली वाढीचे मूल्य
१.	मुंबई येथे स्थित अभियांत्रिकी उपभोग्य वस्तूंची इन्व्हेंटरी	४६२०	५२४८	१,८२,४२,८५,९८१	१८,२४,२८,५९८	९,१२,१४,२९९

*कर, लेव्ही, शुल्क, ड्युटी, हस्तांतरण शुल्क, मुद्रांक शुल्क, नोंदणी शुल्क, प्रीमियम आणि विक्री पूर्ण करण्यासाठीचे इतर सर्व लागू खर्च, जसे की संबंधित एएसपीएमच्या कलम १९ (खर्च, खर्च आणि कर परिणाम) मध्ये अधिक तपशीलवार वर्णन केले आहे, वगळून. खाली सही करणाऱ्या व्यक्तीद्वारे किंवा हानीभरपाई प्राप्त पक्षांद्वारे (संबंधित एएसपीएममध्ये परिभाषित केल्यानुसार) कोणतेही प्रतिनिधित्व, हमी किंवा प्रतिपूर्ती प्रदान केली जाणार नाही.

महत्त्वाच्या टीपा :

१. ही विक्री सूचना मालमत्तेचे तपशील, घोषणा, प्रतिज्ञापत्रे आणि आयबीसीच्या कलम २९अ अंतर्गत पात्रतेसाठी हमीपत्रे सामाविष्ट असलेल्या संबंधित एएसपीएमसह, आणि वरील मालमत्ता आणि लिलाव आयडी विरुद्ध BAANKNET वरील https://ibbi.baanknet.com/ auction-listing येथे किंवा कॉर्पोरेट कर्जदाराच्या www.jetairways.com या संकेतस्थळावर उपलब्ध असलेल्या ई-लिलाव विक्रीच्या सामान्य आणि तांत्रिक नियम आणि अटी सह वाचली जाईल.
२. सर्व परदेशी बोलीदारांनी त्यांच्या सहभागासाठी संबंधित एएसपीएमच्या परिशिष्टाची नोंद घ्यावी. परदेशी बोलीदारांना विशेषत: विनंती आहे की त्यांनी दिनांक ३० ऑक्टोबर २०२६ च्या एएसपीएमच्या परिशिष्टात दिलेल्या विहित नोंदणी प्रक्रिया, कालमर्यादा, पात्रता निकष आणि ईएमडी सबमिट करण्याच्या आवश्यकतांचे पालन करावे.
३. संभाव्य बोलीदारांनी आवश्यक पात्रता कागदपत्रे आणि ईएमडी केवळ आणि काटेकोरपणे ई-लिलाव व्यासपीठाद्वारे विहित कालमर्यादेत, संबंधित एएसपीएमच्या कलम ४ (पात्रता कागदपत्रे) नुसार सबमिट करावेत, लिक्विडेटरकडे नाही.
४. ई-लिलाव व्यासपीठ आणि कागदपत्रे व ईएमडी सबमिट करण्याबाबतच्या कोणत्याही शंकांसाठी, संभाव्य बोलीदारांनी support.baanknet@psballiance.com आणि +९१ ८२९१२२०२२० वर BAANKNET शी संपर्क साधावा.
५. ई-लिलावाबाबतच्या कोणत्याही शंकांसाठी, कृपया लिक्विडेटरचे अधिकृत प्रतिनिधी, श्री. श्लोक नंदनवार (+९१-८२०८५०३६९३) यांच्याशी jetliquidation@in.ey.com आणि liquidation.jet@gmail.com वर संपर्क साधावा, ज्यामध्ये विषयाची ओळ "Engineering Asset Sale - Mumbai Consumables" अशी असावी. कृपया लक्षात ठेवा की पात्रता किंवा बोलीशी संबंधित कोणतेही कागदपत्र लिक्विडेटर, त्यांचे प्रतिनिधी किंवा त्यांचे सल्लागार यांच्याकडे सादर करायची नाहीत.
६. हे स्पष्ट करण्यात येते की ही सूचना विक्री प्रभावी करण्यासाठी खाली सही करणाऱ्या व्यक्तीच्या किंवा जेट एअरवेज (इंडिया) लिमिटेडच्या (परिसमापनात) बाजूने कोणतीही बंधनकारक जबाबदारी निर्माण करत नाही. खाली सही करणाऱ्या व्यक्तीने घेतलेला कोणताही निर्णय अंतिम असेल आणि सर्व संभाव्य बोलीदारांवर बंधनकारक असेल.
७. हे स्पष्ट करण्यात येते की येथे आणि संबंधित एएसपीएममध्ये नमूद केलेले मालमत्तेचे तपशील केवळ आणि केवळ सामान्य संदर्भाच्या उद्देशाने प्रदान केले आहेत. हानीभरपाई प्राप्त पक्ष (संबंधित एएसपीएममध्ये परिभाषित केल्यानुसार) स्पष्टपणे नाकारतात आणि मालमत्तेच्या वर्णनात किंवा स्थितीत कोणत्याही प्रकारची कमतरता/अचूकता/विसंगतता/चुकीचे विधान/वगळणे/भिन्नता/तूट किंवा त्रुटीसाठी कोणतीही जबाबदारी असणार नाही, मग अशी विसंगतता ई-लिलाव पूर्ण होण्यापूर्वी, दरम्यान किंवा नंतर शोधली गेली असो वा नसो. मालमत्तेची विक्री काटेकोरपणे जसे आहे जिथे आहे, जसे आहे जे आहे, जसे आहे जशी स्थिती आहे आणि माघारीशिवाय या तत्त्वावर आणि कोणत्याही प्रतिनिधित्व, हमी किंवा प्रतिपूर्तीशिवाय केली जाते.
८. अंतिम विक्री मोबदल्याचे पेमेंट संबंधित एएसपीएमच्या कलम १५ (अंतिम विक्री मोबदल्याचे पेमेंट) आणि १६ (विक्री पूर्ण करणे) मध्ये नमूद केलेल्या कालमर्यादा, व्याजाच्या तरतुदी आणि जप्तीच्या अटींच्या अधीन आहे.
९. कॉर्पोरेट कर्जदाराच्या धनको समितीच्या सल्ल्यानुसार लिक्विडेटरला, लागू कायद्यानुसार अन्यथा प्रदान केल्याशिवाय, कोणतेही कारण न देता कोणत्याही टप्प्यावर ई-लिलाव प्रक्रिया रद्द करण्याचा किंवा थांबवण्याचा अधिकार आहे.

स्वाक्षरी/-
सतीश कुमार गुप्ता
जेट एअरवेज (इंडिया) लिमिटेडचे लिक्विडेटर
आयपी रजिस्ट्रेशन नं. IBBI/IPA-001/ IP-P00023/2016-17/10056
एएफए क्रमांक: AA1/10056/02/311226/108454
एएफए 31 डिसेंबर 2026 पर्यंत वैध आहे
ईमेल: liquidation.jet@gmail.com

दिनांक: ३०.१०.२०२६
स्थान: मुंबई